# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक ०२ /११/२०१७**

**सभा सुचना क्रंमाक :- १८ दु ११.३० वा.**

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | वसई विरार शहर महानगरपालिकामध्ये सदयस्थितीत असलेल्या संगणक, प्रिंटर व इतर संगणकीय साहित्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी मंजुर ई-निविदा धारकाबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदरबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. याकामी सर्वात कमी दराचे मंजूर निविदाधारक SIRIUS GLOBAL LIMITED या ई-निविदा धारकासोबत संविदा करण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २. | मुख्य कार्यालयाकडील उद्यान विभागास २ नग हायड्रोलिक लॅडर (शिडी) खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करून चर्चा केली असता मुख्य कार्यालयाकडील उद्यान विभागास दोन ९०९ ह्या पध्दतीच्या चेसी खरेदी करणेस व हायड्रोलिक लॅडर (शिडी) बसविण्याचे काम इच्छुक निविदाधारकाकडून खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस तसेच चेसी व हायड्रोलिक लॅडर (शिडी) बसविण्याकरीता अंदाजित रु. ६६,००,०००/- पर्यंतच्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ७ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१७ साठी स्पर्धेचे इव्हेंन्ट मॅनेजमेन्ट करणे व त्या अनुषंगीक ईतर कामे करणेकामीचे सर्वात कमी दराचे ई-निविदाधारक यांचे दर मंजुर करुन त्यांच्याशी करारनामा करणेंस, कामाचा कार्यादेश देणे याबाबत आर्थीक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- वरील प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या ७ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१७ साठी स्पर्धेचे इव्हेंन्ट मॅनेजमेन्ट करणे व त्या अनुषंगीक इतर कामे करणेकामी प्राप्त ई-निविदेतील सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. आर्यन्ज स्पोर्ट्स पीआर ॲन्ड इव्हेन्ट यांची ई-निविदा मंजूर करणेंत येत असून त्यांच्याशी करारनामा करणेस कामाचा कार्यादेश देणेस, कामाची होणारी देयके अदा करणेंस ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे. तसेच या स्पर्धेचे इव्हेन्ट मॅनेजमेंट करणारे मंजूर निविदाकार मे.आर्यन्ज स्पोर्ट्स पीआर ॲन्ड इव्हेन्ट यांच्या मंजूर निविदा दर रुपये १५,५७,६००/- रक्कमेच्या शेकडा ७५% रक्कम आगाऊ स्वरुपात तात्काळ अदा करण्यास देखील ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. तसेच नामंजूर निविदाधारकांस त्यांची अनामत रक्कम नियमानुसार परत करणेंस ही सभा वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ७ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१७ साठी आर्ट वर्क | ठराव :- वरील प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या ७ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१७ साठी स्पर्धेचे आर्ट वर्क (डिझाईन) व त्या अनुषंगीक इतर कामे |

| | | |
|---|---|---|
| | (डिझाईन) व त्या अनुषंगीक ईतर कामे करणेकामीचे सर्वात कमी दराचे ई-निविदाधारक यांचे दर मंजुर करुन त्यांच्याशी करारनामा करणेंस, कामाचा कार्यादेश देणे याबाबत आर्थीक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. | करणेकामी प्राप्त ई-निविदेतील सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. राजेंद्र के.वनमाळी यांची ई-निविदा मंजूर करणेंत येत असून त्यांच्याशी करारनामा करणेस कामाचा कार्यादेश देणेस, कामाची होणारी देयके अदा करणेंस ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे. तसेच या स्पर्धेचे आर्ट डिझाईन करणारे मंजूर निविदाकार मे.राजेंद्र के.वनमाळी यांच्या मंजूर निविदा दर रुपये ६,७०,२४०/- रक्कमेच्या शेकडा ७५% रक्कम आगाऊ स्वरुपात तात्काळ अदा करण्यास देखील ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. तसेच नामंजूर निविदाधारकांस त्यांची अनामत रक्कम नियमानुसार परत करणेंस ही सभा वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर ना. पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विविध प्रभाग समितींमार्फत कलाक्रिडा महोत्सवाच्या आयोजनासाठी अर्थसंकल्पीय पुनर्विनियोजनास मान्यता घेणेबाबत. | ठराव :- वरील विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली त्यानुसार प्रस्तावात नमुद प्रमाणे प्रभाग समिती जी,एच व आय साठी रु. ३० लक्ष, प्रभाग ए बोळींज, प्रभाग समिती ई नालासोपारा चंदनसार करिता रु.४५ लक्ष असा रु.१.२० कोटी खर्च अपेक्षीत आहे. तद्नुसार एकुण रु २,५८,२१,६६९/- खर्च होत असुन प्रभागामार्फत परस्पर होणारा आवश्यक खर्च विचारात घेता रु.२.६२ कोटी इतकी तरतूद उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्याकामी वसई तालुका कला-क्रिडा महोत्सव व इतर क्रीडा संस्थांना व व्यायाम शाळांना अनुदान या लेखशिर्षातंर्गत रु.१.५० कोटी तरतुदी मधून रु.५० लक्ष इतकी तरतुद क्रीडा विषयक राखीव तरतुदी अंतर्गत वसई आंतरशालेय कला-क्रीडा महोत्सव या लेखाशिर्षामध्ये कला-क्रीडा महोत्सवाच्या आयोजनासाठी पुन:विनियोजनाद्वारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ तसेच प्रकरण ७ नियम २ (२) नुसार पुन:विनियोजनाद्वारे वर्ग करणेंस आजची ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.सखाराम महाडिक सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती "ए" बोळींज, प्रभाग समिती "बी" विरार (पुर्व) व प्रभाग समिती "सी" चंदनसार वसई हद्दीतील शालेय व महाविदयालयीन विदयार्थ्यांकरिता आंतरशालेय कला क्रीडा महोत्सव २०१७ चे आयोजन करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत आजच्या स्थायी समितीच्या सभेत सविस्तर चर्चा होऊन महानगरपालिकेच्या वतीने प्रभाग समिती "ए", "बी", "सी" कार्यालयहद्दीत शालेय कला क्रीडा महोत्सव २०१७ स्पर्धेचे आयोजन करण्यांस आजची ही सभा मंजुरी देत आहे. या कला व क्रीडा स्पर्धांसाठी येणारे पंच,परिक्षक, कला शिक्षण, क्रीडा शिक्षक व कलाकार यांचे मानधन रोखीने अदा करणेकामी अग्रीम स्वरुपात रक्कम तसेच कला क्रीडा स्पर्धेचे उत्तम प्रकारे नियोजन करणेकामी प्रस्तावात नमुद त्या बाबींसाठी वार्षीक ठेकेदार यांचे मंजुर ठेक्यातुन साहित्य, चिज, वस्तु उपलब्ध करुन घेणे/कामे करुन घेणे तसेच उर्वरीत व अनुषंगीक व आवश्यक बाबीसाठी, दरपत्रक/रोखीन spot खरेदी, निविदा व ई-निविदा प्रक्रीयेद्वारे कार्यवाही करणेंस व कला क्रीडा महोत्सवाचे यशस्वी आयोजन करणेकामी रुपये ४५ लक्ष इतक्या खर्चास आजची ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडिक सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ७. | महानगरपालिका कायद्यातील महत्वाच्य तरतुदी,अंदाजपत्रक, सभाशास्त्र व इतर विषयावर लोकप्रतिनिधी व अधिकारी कर्मचारी यांचेसाठी प्रशिक्षण शिबिर/अभ्यास दौराकरिता आर्थीक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सादर केलेल्या प्रस्तावात नमुद असल्याप्रमाणे ऑल इंडिया इन्स्टीट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेन्ट यांनी दिनांक ०५/११/२०१७ ते ०७/११/२०१७ या दरम्यान माउंट अबु, राज्यस्थान येथे अभ्यासदौरा व प्रशिक्षण आयोजन करणेंकामी दिलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यांत येत असून सदर अभ्यास दौऱ्याचे आयोजनास येणाऱ्या रक्कमेपैकी दिलेल्या प्रस्तावात नमुद केलेली रुपये २४,७८,०९०/- इतकी रक्कम ऑल इंडिया इन्स्टीट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेन्ट या संस्थेस भरणा केलेल्या कार्यवाहीस व त्या अनुषंगाने प्रशासनाने केलेल्या सर्व कार्यवाहीस ही आर्थिक व प्रशासकीय मंजुरी प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. किशोर ना. पाटील सूचक :- मा.श्री. अजीत नाईक<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दिनांक ०२ /११/२०१७

सभा सुचना क्रंमाक :- १९    दु ११.३० वा.

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | वसई विरार शहर महानगरपालिका, नालासोपारा विभागातील "शालेय विद्यार्थ्यांसाठी शालेय कला-क्रिडा महोत्सव २०१७" साजरा करणे बाबत चर्चा करुन निर्णय घेणे. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन महानगरपालिकेच्या वतीने नालासोपारा शालेय कला-क्रीडा महोत्सव २०१७ मध्ये प्रभाग समिती ब,ड,ई, व फ क्षेत्रातील शाळांचा समावेश असून प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे १) ध्वनी प्रक्षेपण व विद्युतीकरण २) स्टेज मंडप डेकोरेशन ३) छपाई व स्टेशनरी पुरवठा करणे ४) खानपान व इत्यादीबाबतची निविदा महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागातील मंजूर ठेकेदारांकडून कामे करणेस तसेच सी.सी.सी. टि.व्ही कॅमेरे कला क्रीडा विभागात भाड्याने पुरवठा करणे, शाळेकडून प्राप्त होणाऱ्या प्रवेशपत्रिकांची डेटा एन्ट्री करणे, स्पर्धकांची ओळखपत्रे व स्टिकर तयार करणे इ.कामे दरपत्रके मागविणेस तसेच, पंच, परिक्षक व पाहुण्यांचे मानधन देणेकामी रोख अग्रीम घेणेस व त्या अनुषंगिक बाबींसाठी विविध कार्यपध्दतीचा अवलंब करुन कामे करण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ४५,००,०००/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br><br>अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील    सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव

वसई-विरार शहर महानगरपालिका